# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई.

एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला प्लॉट नं. सी २२,
ब्लॉक - ई , वांद्रे- कुर्ला संकुल बान्द्रा (पुर्व),मुंबई ४०० ०५१ .

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या ५६ व्या बैठकीचे इतिवृत्तांत

*******

| | | |
|---|---|---|
| बैठक स्थळ | :- | मा. कामगार आयुक्त यांचे कार्यालय, ४था मजला समिती सभागृह ई -ब्लॉक, सी-२० वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१ |
| दिनांक | :- | २७.१०.२०२० (मंगळवार) |
| वेळ | :- | दुपारी १.०० वाजता |

**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २७.१०.२०२० रोजी संपन्न झालेल्या ५६ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील, मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५६ वी बैठक मंगळवार दिनांक २७.१०.२०२० रोजी दुपारी ०१.०० वा. मा. कामगार आयुक्त यांचे कार्यालय, समिती सभागृह, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य बैठकीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. दिलीप दत्तात्रय वळसे-पाटील | मा.मंत्री महोदय, कामगार विभाग तथा मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्रीम. विनिता वेद सिंघल, सचिव, कामगार | शासकीय प्रतिनिधी |
| ३. | मा. डॉ. महेंद्र कल्याणकर, कामगार आयुक्त | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, सह सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्री. सतीश मगर | मालक प्रतिनिधी |
| ६. | मा. श्रीम. वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. अशोक भुताड | कामगार प्रतिनिधी |
| ८. | मा. श्री. श्रीपाद कुटासकर | कामगार प्रतिनिधी |
| ९. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| १०. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय,कामगार विभाग तथा मा. अध्यक्ष, मा. सचिव, कामगार विभाग मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक १३.०७.२०२० रोजीच्या मंडळाच्या ५५ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र.०१ :- मंडळाच्या दि.१३.०७.२०२० रोजी संपन्न ५५ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५५ वी बैठक दिनांक १३.०७.२०२० रोजी दुपारी २.०० वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तांतास मा.अध्यक्ष महोदयांनी मान्यता दिली आहे. सदर इतिवृत्तातांत काही बदल असल्यास सुचवावा अशी विनंती मंडळ सचिवांनी केली. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ५५(१)/२०२०:- मंडळाच्या दि.१३.०७.२०२० रोजीच्या ५५ व्या बैठकीचे इतिवृत्तांत कायम करण्यास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०२ :- कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव काळात नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अर्थसहाय्याचा रू.३०००/- चा दुसरा हप्ता वितरणाबाबत**

याबाबत मंडळ सचिवांनी असे सादर केले की, शासन मान्यतेनुसार मंडळस्तरावरून दि.१६.१०.२०२० अखेर रू.२०००/- प्रमाणे पहिल्या टप्प्यात ९,१५,०१२ बांधकाम कामगारांना व दुसऱ्या टप्प्यात रू.३०००/- प्रमाणे ८,३९,६२३ बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य वाटप करण्यात आले. अर्थसहाय्य वाटपावर रू. रू.४३४.८८ कोटी एवढा खर्च झालेला आहे. अर्थसहाय्य वाटपाचा जिल्हानिहाय तपशील बैठकीत सादर करण्यात आला. सदर विषय मंडळाच्या माहिती व अवलोकनार्थ सादर केलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६(२)/२०२० :- शासन मान्यतेनुसार मंडळस्तरावरून दि.१६.१०.२०२० अखेर रू.२०००/- प्रमाणे पहिल्या टप्प्यात ९,१५,०१२ बांधकाम कामगारांना व दुसऱ्या टप्प्यात रू.३०००/- प्रमाणे ८,३९,६२३ बांधकाम कामगारांना अर्थसहाय्य वाटपाच्या जिल्हानिहाय तपशीलाची व त्यावरील रू.४३४.८८ कोटी एवढया खर्चाची मंडळाकडून नोंद घेण्यात आली, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०३ :- अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांच्या पात्रतेबाबत शासन निर्णयात नमूद दि.३१.०५.२०१९ पर्यंतची कालमर्यादा बदलणेबाबत विचार विनिमय करणे.**

मंडळ सचिवांनी अटल बांधकाम कामगार आवास योजनेबाबतचा सविस्तर तपशील, आजपावेतो मंजूर लाभार्थी संख्या, घरकुल पूर्ण झालेले संख्या व खर्चाचा जिल्हानिहाय तपशील बैठकीत सादर केला. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय दि.०४.०७.२०१९ अन्वये नोंदीत बांधकाम कामगारांना लाभ घेण्याकरीता दि.३१.०५.२०१९ किंवा तत्पूर्वी नोंदणीच्या अटीबाबतची कालमर्यादा वाढविणेबाबतचा प्रस्ताव बैठकीत सादर केला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६(३)/२०२० :- अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण) या योजनेचा शासन निर्णय दि.०४.०७.२०१९ अन्वये नोंदीत बांधकाम कामगारांना लाभ घेण्याकरीता दि.३१.०५.२०१९ किंवा तत्पूर्वी नोंदणीच्या अटीबाबतची कालमर्यादा दि.१५.१०.२०२० पर्यंत वाढविण्यात यावी, याबाबतचा ठराव तात्काळ शासनास पाठवावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय :- ०४ नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता कौशल्य वृध्दीकरण योजना (RPL) राबविणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाने वेळोवळी पारित केलेल्या ठरावानुसार दि.३१.०३.२०१९ पर्यंत केंद्र शासनाच्या पॅनेलवरील प्रशिक्षण संस्था व असेसिंग बॉडीज मार्फत ४०,४६९ बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण योजनेचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या पॅनेलवरील संस्थांची मुदत दि.३१.०३.२०१९ रोजी संपुष्टात आल्यामुळे सदर प्रशिक्षण देता आलेले नाही.

उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.१६.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये निती आयोग (भारत सरकार) यांच्याकडून प्राप्त निर्देश, Model Welfare Scheme मधील मंडळाकडे जमा होणाऱ्या उपकराच्या १०% रक्कम प्रशिक्षणावर खर्च करण्याची तरतूद तसेच केंद्र शासनाच्या दि.२४.०७.२०१९ रोजीच्या पत्रासोबतच्या मार्गदर्शक सूचनाबाबतचा सविस्तर तपशील बैठकीत सादर करण्यात आला. केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त सूचना विचारात घेता बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण (RPL) प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. या संदर्भात मंडळ स्तरावरून करण्यात आलेली कार्यवाही व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांचेसोबत झालेली चर्चा व त्यास अनुसरून सोसायटीकडून अपेक्षित प्रस्तावाबाबत तपशील सादर करण्यात आला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६ (४)/२०२० :-**

**१. मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना कौशल्य वृध्दीकरण (RPL) चे प्रशिक्षण देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**२. कौशल्य वृध्दीकरण (RPL) प्रशिक्षणाकरीता ट्रेड, प्रशिक्षणाचा कालावधी, प्रशिक्षणाचे प्रति लाभार्थी दर, प्रशिक्षणार्थींना वेतन नुकसान भरपाईचे दर ठरवणे, प्रशिक्षण संस्था व असेसिंग बॉडीजची नियुक्ती करणे याकरीता मा.सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली कामगार आयुक्त, सहसचिव/ उपसचिव, सचिव तथा मु.का.अ, मइवइबाकाक मंडळ व जिल्हा कार्यकारी अधिकारी, मइवइबाकाक मंडळ या ०५ सदस्यांची समिती स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०५ :- पालघर जिल्हयातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन वितरीत करण्याबाबत विचार विनिमय करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाने वेळोवेळी पारित केलेले ठराव व शासन मान्यतेनुसार मध्यान्ह भोजन योजना माहे मार्च २०१९ पासून सुरू करण्यात आलेली आहे. नियुक्त पुरवठादार संस्थांना मुंबई/ नवी मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर येथे प्रायोगिक तत्वावर बांधकामाच्या ठिकाणी मध्यान्ह भोजन वितरणाचे आदेश देण्यात आले होते. मंडळाच्या बैठकीत पारित ठरावानुसार कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भाव काळात नोंदीत व अनोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन वितरीत करणे, बांधकाम कामगार हिश्याची रक्कम न घेणे, रात्रीचे जेवण वितरीत करणे ही कार्यपध्दती माहे नोव्हेंबर पर्यंत कार्यान्वित राहणार आहे. पालघर जिल्हयामध्ये मध्यान्ह भोजन योजना कार्यन्वित करणेबाबत प्राप्त मागणीचा तपशील मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६(५)/२०२० :- मध्यान्ह भोजन योजना दि.३१ मार्च २०२१ पर्यंत प्रायोगिक तत्वावर सुरू ठेवावी, पालघर जिल्हयात नियुक्त संस्थेमार्फत मध्यान्ह**

**भोजन वितरण त्वरीत सुरू करावे, राज्यातील अन्य जिल्हयातही मध्यान्ह भोजन योजना राबविण्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याकरीता जिल्हयातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार संख्या, बांधकामाची ठिकाणे, मध्यान्ह भोजन योजनेच्या निकषानुसार स्वयंपाकगृह व अन्न पदार्थ वाहतूक व्यवस्था याबाबतचा आढावा घेऊन योजना सुरू करण्याबाबतचा जिल्हानिहाय प्रस्ताव मंडळाच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०६ :- मंडळाकडील नोंदणी, नुतणीकरण व विविध कल्याणकारी योजनांच्या प्रचार प्रसिध्दीबाबत विचार विनीमय करणे**

मंडळ सचिवांनी प्रचार प्रसिध्दीबाबत केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त निर्देशाचा तपशील, सन २०१९-२०२० मध्ये प्रचार व प्रसिध्दीकरीता माध्यमनिहाय मंजूर आराखडा, प्रत्यक्ष खर्च, प्रस्तावित खर्चाचा तपशील सादर केला. सन २०२०-२१ या चालू वित्तीय वर्षाकरीता मंडळाने माध्यमनिहाय मंजूर केलेला रू.३०.०० कोटीचा आराखडा व चर्चेअंती सदर आराखडयातील प्रस्तावित बदलाबाबतचा खालीलप्रमाणे तपशील मंडळाच्या विचार विनिमयाकरीता सादर करण्यात आला.

| अ. क्र. | माध्यम | दर मंजूर करणारी संस्था | माध्यमनिहाय प्रस्तावित खर्च (रू. कोटी) | माध्यम निहाय सुधारित खर्च (रू. कोटी) |
|---|---|---|---|---|
| १ | MSRTC Panels | As per DGIPR rate | ५.०० | ३.०० |
| २ | Hoardings | As per DAVP rate | ६.०० | ४.०० |
| ३ | MSRTC Hoardings | As per DAVP rate | १.०० | १.०० |
| ४ | Bus Queue Shelters (in Mumbai) | As per DAVP rate | ३.०० | २.०० |
| ५ | MSRTC announcements at Bus Stands | As per rate applicable | ३.०० | २.०० |
| ६ | Documentary Production | As per DGIPR rate | ०.१० | ०.१० |

| अ. क्र. | माध्यम | दर मंजूर करणारी संस्था | माध्यमनिहाय प्रस्तावित खर्च (रू. कोटी) | माध्यम निहाय सुधारित खर्च (रू. कोटी) |
|---|---|---|---|---|
| ७ | Radio Spot & Jingle Production | As per DGIPR rate | ०.१६ | ०.१६ |
| ८ | Mobile LED Van for Promotion | Mobile Van | ३.०० | -- |
| ९ | Print | As per DGIPR rate | १.५० | ४.०० |
| १० | TV Media | As per DAVP rate | ०.५० | ३.५० |
| ११ | Electronic Sign Board | As per DAVP rate | १.०० | २.५४ |
| १२ | Social Media | As per requirement | ०.५० | ०.१० |
| १४ | Radio | As per DAVP rates | ०.५० | १.०० |
| १५ | TV Creative Production | As per DGIPR rate | ०.६० | ०.६० |
| १६ | Creative adaptations & Booklet Designing | As per requirement | ०.१४ | -- |
| १७ | Benefit Distribution Programe | As per requirement | ४.०० | -- |
| १८ | Best/TMC/ NMMC/ other Muncipal Corporation Panells | As per Approved rate | -- | ३.०० |
| १९ | Government Hoardings at Collector office/ SDO/ ZP/ PS etc. | As per DGIPR rate | -- | ३.०० |
| | | Total | ३०.०० | ३०.०० |

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला

**ठराव क्र.५६ (६)/२०२० :- मंडळाच्या दि.१३.०२.२०२० रोजी संपन्न बैठकीत सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षासाठी प्रचार व प्रसिध्दीकरीता मंजूर केलेल्या आराखडयातील माध्यम व त्यावरील खर्चातील प्रस्तावित बदलास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०७ :- मंडळाच्या निविदा/ अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) तयार करणे व अनुषंगिक कामाकरीता सल्लागारांची नियुक्ती करणेबाबत विचार विनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार मे. केपीएमजी या संस्थेकडील ०५ सल्लागार दि.१५.१०.२०१९ पर्यंत मंडळाच्या कामकाजाकरीता कार्यरत होते. सदर सल्लागारांच्या मदतीने बांधकाम कामगारांना सुरक्षा संच देणे, अत्यावश्यक संच, मध्यान्ह भोजन, कौशल्य विकास प्रशिक्षण, आवास योजना या योजनांच्या निविदा / EOI तयार करणे, लाभ वाटपाचे कार्यक्रम, मंडळाच्या कामकाजाचे संगणकीकरण, विभागीय व जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणे इत्यादी कामे करण्यात आली होती. उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि. १४.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर सल्लागारांच्या सेवा दि.१५.१०.२०१९ पासून संपुष्टात आणण्यात आलेल्या आहेत. सद्यस्थितीत मंडळाकडे कोणत्याही सल्लागारांच्या सेवा कार्यरत नाहीत.

माहिती व तंत्रज्ञान विभागाकरीता शासन निर्णय दि.०९.०५.२०१९ नुसार एम्पेनेल ०६ सल्लागार संस्थांपैकी एका संस्थेकडून सल्लागारांची नियुक्ती प्रस्तावित आहे. कामगार विभागात मंडळाच्या आयटी विषयक कामकाजाबाबत समन्वयाकरीता ०२ सल्लागार व मंडळाच्या कामकाजाकरीता ०२ सल्लागार असे एकूण ०४ सल्लागारांची नियुक्तीबाबतचा सविस्तर तपशील मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला .

**ठराव क्र.५६ (७)/२०२० :- माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभागाच्या पॅनेलवरील मे. ग्रँन्ट थॉर्न्टन (Grant Thornton) या संस्थेकडून कामगार विभागात मंडळाच्या आयटी विषयक कामकाजाबाबत समन्वयाकरीता ०२ व मंडळाच्या मुख्यालयाकरीता ०२ अशा एकूण ०४ सल्लागारांची नेमणूक करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०८:- नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप करणेबाबत विचारविनिमय करणे.**

याबाबत मंडळ सचिवांनी मंडळाच्या दि.०३.०६.२०१९ रोजीच्या ५१ व्या बैठकीतील ठराव, सदर ठरावास अनुसरून प्राप्त शासन मान्यता, गृहपयोगी वस्तू संच वितरणाकरीता संस्था नियुक्तीबाबत राबविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया, ई-निविदा प्रक्रियेदरम्यान प्राप्त निवेदने व त्यास अनुसरून मंडळ व शासन स्तरावरून निविदा प्रक्रिया रद्द करणेबाबतचा सविस्तर तपशील मंडळाच्या बैठकीत सादर केला.

सदर निविदा प्रक्रिया रद्द करताना शासन स्तरावरून प्राप्त निर्देशानुसार नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगार संख्येचा आढावा घेऊन राज्यातील ०६ विभागाचे खालील दोन गटात विभागणी करून प्रत्येकी ०५ लक्ष प्रमाणे दोन गटामध्ये १० लक्ष नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांकरीता गृहपयोगी वस्तू संच वितरणाची ई-निविदा मागविणे प्रस्तावित आहे.

| **अ.क्र.** | **गट** | **विभागाचे नाव** | **नोंदीत सक्रिय बांधकाम कामगारांची संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | गट क्र.०१ | औरंगाबाद व नागपूर | ५,००,००० |
| ०२ | गट क्र.०२ | मुंबई, पुणे, नाशिक व अमरावती | ५,००,००० |
| | | **एकूण** | **१०,००,०००** |

मंडळातील नोंदीत सक्रीय बांधकाम कामगारांकरीता यापूर्वी निश्चीत गृहपयोगी वस्तू संचातील सतरंजी (१ नग) चादर (२ नग) कमी करून त्याऐवजी गृहपयोगी संचात प्रेशर कुकर (१ नग) व कढई (१ नग) या वस्तूंचा समावेश करून खालीलप्रमाणे गृहपयोगी संचातील वस्तू व नग नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना वितरणाकरीता उपरोक्त प्रस्ताव मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता.

| **अ.क्र.** | **गृहपयोगी संचातील वस्तू** | **नग** |
|---|---|---|
| १. | ताट | ०४ |
| २. | वाटया | ०८ |
| ३. | पाण्याचे ग्लास | ०४ |
| ४. | पातेले झाकणासह (१२ इंच) | ०१ |
| ५. | पातेले झाकणासह (१३ इंच) | ०१ |
| ६. | पातेले झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| ७. | मोठा चमचा (भात वाटपाकरीता) | ०१ |
| ८. | मोठा चमचा (वरण वाटपाकरीता) | ०१ |

| अ.क्र. | गृहपयोगी संचातील वस्तू | नग |
|---|---|---|
| ९. | पाण्याचा जग (१.५ लीटर) | ०१ |
| १०. | मसाला डब्बा (०७ भाग) | ०१ |
| ११. | डब्बा झाकणासह (१४ इंच) | ०१ |
| १२. | डब्बा झाकणासह (१६ इंच) | ०१ |
| १३. | डब्बा झाकणासह (१८ इंच) | ०१ |
| १४. | परात | ०१ |
| १५. | प्रेशर कुकर -०५ लिटर (स्टेनलेस स्टील) | ०१ |
| १६. | कढई (स्टील) | ०१ |
| १७. | स्टीलची टाकी झाकणासह (मोठी) | ०१ |
| | एकूण | ३० |

मंडळामार्फत प्रस्तावित १० लक्ष नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वितरणाबाबत मंडळाच्या दि.१३.०७.२०२० रोजीच्या ५५ व्या बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर बैठकीत पारित ठरावानुसार गृहपयोगी वस्तू संच वाटपाचा सुधारित प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आलेला आहे. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६(८)/२०२० :- मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) १० लक्ष बांधकाम कामगारांना प्रस्तावित गृहपयोगी संच वितरणास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. राज्यातील ०६ विभागातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची दोन गटात विभागणी करून प्रस्तावित गृहपयोगी संच वितरीत करण्यात यावे. कामगार विभागाने नियुक्त केलेल्या खरेदी समितीच्या मान्यतेने गृहपयोगी वस्तूचे परिमाण (Specification) व संचाची अंदाजित किंमत निश्चित करून शासन मान्यतेअंती ई-निविदा पध्दतीने गटनिहाय गृहपयोगी वस्तू संच वितरणासाठी संस्था नियुक्त करावी. मंडळ व शासन स्तरावरून गृहपयोगी वस्तू संच वाटपाच्या अटी शर्ती निश्चित करून त्यानुसार संच वाटपाची कार्यवाही करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.०९:- जिल्हा कामगार सुविधा केंद्रामध्ये (WFC) इनव्हर्टर बसविणेबाबत विचारविनिमय करणे.**

मंडळ सचिवांनी मंडळाचे मुख्यालय व जिल्हा स्तरावर जिल्हा कामगार सुविधा केंद्र स्थापन करणेबाबत मंडळाचे ठराव, शासन मान्यता याबाबतचा तपशील बैठकीत सादर

केला. तसेच, प्रस्तावित ४१ कामगार सुविधा केंद्रापैकी आजमितीस एकुण १४ जिल्हा कामगार सुविधा केंद्र कार्यान्वित झालेले आहेत. त्यापैकी औरंगाबाद, जालना, नांदेड, सोलापूर, अमरावती व भंडारा या ०६ कार्यालयाकडुन मंडळाच्या कामगार सुविधा केंद्रामध्ये इनव्हर्टर व बॅटरी बॅकअप उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आलेली आहे. मंडळाच्या वास्तुविशारदाकडून प्राप्त अभिप्रायानुसार जिल्हा कामगार सुविधा केंद्राकरीता आवश्यक इनव्हर्टर व बॅटरी बॅकअपच्या परिमाणानुसार प्रति इनव्हर्टर व बॅटरी बॅकअप रू.८०,०००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. जिल्हा कामगार सुविधा केंद्राकडून प्राप्त मागणीनुसार इनव्हर्टर व बॅटरी बॅकअप बसविण्याचे प्रस्तावित आहे, असा प्रस्ताव मंडळ बैठकीत सादर केला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६ (९)/२०२० :- मंडळाच्या सर्व जिल्हा कामगार सुविधा केंद्रामध्ये इनव्हर्टर व बॅटरी बॅकअप बसविण्यास व प्रति इनव्हर्टर व बॅटरी बॅकअपकरीता अंदाजित रू.८०,०००/- एवढया खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्र.१० क्षेत्रीय कार्यालयाच्या कामाकाजासंदर्भात मा. लोकप्रतिनिधी, कामगार संघटना व अन्य व्यक्ती/ संस्थाकडून प्राप्त तक्रारीची तपासणी करण्यासाठी तपासणी पथक स्थापन करणेबाबत.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळामार्फत करण्यात येत असलेली नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटप कामगार आयुक्तलयांतर्गत क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत आहे. मंडळामार्फत करण्यात येत असलेली नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाचा तपशील बैठकीत सादर करण्यात आला. क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत असलेली नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपाबाबत शासन, कामगार आयुक्तालय व मंडळाकडे अनेक तक्रारी प्राप्त होतात. सदर तक्रारीला अनुसरून कामगार आयुक्तालयाकडून तपासणी करणेबाबत निर्देश प्राप्त झालेले आहेत. मंडळ स्तरावर अश्या तक्रारींची तपासणी करण्यासाठी सद्यस्थितीत तपासणी पथक उपलब्ध नाही त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाच्या कामाकाजासंदर्भात मा. लोकप्रतिनिधी, कामगार संघटना व अन्य व्यक्ती/ संस्थाकडून प्राप्त तक्रारीची तपासणी करण्यासाठी तपासणी पथक स्थापन करणे प्रस्तावित आहे. त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव बैठकीत सादर करण्यात आला. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६ (१०)/२०२० :- क्षेत्रिय कार्यालयाच्या कामकाजाविषयी प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तपासणी करण्यासाठी कामगार विभागाच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांची तपासणी समिती गठीत करण्यात यावी, तपासणी समिती गठीत करण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र. ११:- मंडळाच्या उपकर खाती नजर चुकीने किंवा अनावधानाने जमा करण्यात आलेल्या रक्कमेच्या परताव्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाने वेळोवेळी मंजूर केलेल्या ठरावानुसार व प्रस्तावांच्या छाननीअंती शासन मान्यता प्राप्त करून उपकर खाती नजरचुकीने किंवा अनावधानाने जमा करण्यात आलेल्या रक्कमेचा परतावा करण्यात येत आहे. यापूर्वी प्राप्त प्रस्ताव, शासन मान्यता, परतावा अदा करण्यात आलेली प्रकरणे व प्रलंबित प्रकरणांचा तपशील बैठकीत सादर करण्यात आला.

सद्यस्थितीत, मंडळाकडे ४ उपकराची प्रकरणे प्राप्त झालेली असून, विविध प्राधिकरण/संस्था/व्यक्ति यांच्याकडून नजरचुकीने/ अनावधनाने मंडळाच्या उपकर खाती भरणा करण्यात आलेल्या रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | प्राधिकरण/संस्था/व्यक्ति चे नाव | उपकर परताव्याचे कारण | उपकर परताव्याच्या मागणीची रक्कम (रुपयात) |
|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ, महापे नवी मुंबई. | मे. यशराज बायोट्रक्नोलोजी लि.या संस्थेने प्लॉट क्रं. EL २५ क्षेत्रफळ ८१२१९.३९ व प्लॉट क्र. EL २५ (Part) चे क्षेत्रफळ ३०५४४.८६ अशा एकूण १११७६४.२५ स्क्वेअर मीटर क्षेत्रफळावरील बांधकामासाठी वेळोवळी रू.२,७९,४१,०६०/- (२०३०४८४५.००+७६३६२१५) उपकर रक्कमेचा भरणा कार्यकारी अभियंता, औद्योगिक विकास महामंडळ, महापे , नवी मुंबई यांचेकडे केला. सदर रक्कम औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बँक खात्यात दि.०२.०९.२०१५ व ०२.०३.२०१६ रोजी जमा केली आहे. **मंडळाकडे जमा रक्कमेबाबत खात्री करण्यात आली आहे.** मे. यशराज बायोट्रक्नोलोजी लि यांचे प्रकल्प | १,५०,६८,०६०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | नकाशे सुधारित होऊन बांधकामाचे चटई क्षेत्रफळ ५१४९२ स्क्वेअर मीटर झाल्याने जादा भरणा केलेली उपकराची रक्कम रु.१,५०,६८,०६०/- चा परतावा करण्याची विनंती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावाची छाननी कामगार उप आयुक्त, ठाणे यांच्याकडून करण्यात आलेली आहे. | |
| २. | नगर परिषद, नागभीड | नगर परिषद, नागभीड, ता. नागभीड, जि. चंद्रपूर यांचेकडून मे. मेहता इंटरप्राईजेस नागपूर यांच्या खात्यात रु.७८,९५०/- धनादेशाने भरणा करण्याऐवजी नजरचुकीने सदरची रक्कम मंडळाच्या उपकर खात्यात दि.१२.०९.२०१९ रोजी RTGS द्वारे जमा करण्यात आली आहे. **मंडळाकडे जमा रक्कमेची खात्री करण्यात आली आहे.** नगर परिषद, नागभीड, ता. नागभीड, जि. चंद्रपूर यांनी सदर रक्कमेच्या परताव्याची मागणी केली आहे. | ७८,९५०/- |
| ३ | अतुल किसन पोळ, मु.पो.कंळबवाडी (पा) ता.बार्शी.जि.सोलापूर | श्री. अतुल किसन पोळ यांनी ०१.०६.२०२० रोजी २६,१७८/-धनादेश द्वारे मंडळाच्या बँक खात्यात जमा केली होती. श्री. अतुल किसन पोळ यांनी पुनश्च नजरचुकीने दि.०६.०६.२०२० रोजी RTGS द्वारे रु.२६,१७८/- मंडळाच्या बँक खात्यात जमा केली आहे. **मंडळाकडे दुबार जमा रक्कमेची खात्री करण्यात आली आहे.** एकाच कामासाठी | २६,१७८/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उपकराची रक्कम दुबार भरली गेल्याने अर्जदार श्री. अतुल किसन पोळ यांनी दुबार भरणा करण्यात आलेल्या रक्कम रु. २६,१७८/- चा परतावा करण्यास विनंती केली आहे. | |
| ४ | तालुका कृषी अधिकारी भद्रावती | तालुका कृषी अधिकारी भद्रावती यांच्याकडून मंडळाच्या उपकर जमा करावयाच्या खात्यात ७१,७९३/- रक्कम चूकीने भरणा करण्यात आली आहे. सदर रक्कम मंडळाच्या बँक खात्यात दि. ३०.५.२०२० **रोजी जमा झाल्याची खात्री करण्यात आली आहे.** तालुका कृषी अधिकारी भद्रावती यांनी नजरचुकीने भरलेली रक्कम परत करण्यास विनंती केली आहे. | ७१,७९३/- |
| | | **एकूण रक्कम** | **१,५२,४४,९८१/-** |

उपरोक्त ०४ प्रकरणातील प्राधिकरण/संस्था/व्यक्ती यांजकडून मंडळाकडे नजर चुकीने किंवा अनावधानाने जमा करण्यात आलेली रक्कम रु. १,५२,४४,९८१/- चा परतावा करण्यास मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. मंडळाच्या मान्यतेअंती शासन मान्यता प्राप्त करून परताव्याची रक्कम संबंधितांना अदा करणे प्रस्तावित आहे. सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६ (११)/२०२० :- प्रस्तावित ०४ प्रकरणातील प्राधिकरण/ संस्था/ व्यक्ती यांच्याकडून मंडळाच्या खाती नजरचुकीने किंवा अनावधानाने जमा करण्यात आलेली रक्कम रू. १,५२,४४,९८१/- मंडळ स्तरावरून परत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**विषय क्र.१२ श्री.अरविंद तेलवाडकर- कार्मिक अधिकारी यांच्या प्रतिनियुक्तीचा कालावधी वाढविणे व औरंगाबाद विभागीय कार्यालयात पदस्थापना करणेबाबत विचार विनिमय करणे.**

मा. अध्यक्ष महोदय यांच्या सूचनेनुसार सदरचा विषय मागे घेण्यात आला.

**आयत्य वेळचा विषय क्र.१३ :-** **कामगार आयुक्त कार्यालयाच्या सभागृहामध्ये व्हिडोओ वॉल व व्हिडोओ कॉन्फरन्सिंग सिस्टम बसविणेबाबत विचारविनिमय करणे**

कामगार आयुक्तालयाकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मंडळ सचिवांनी सादर केले की, कामगार आयुक्तालयाच्या कामगार भवन इमारतीमध्ये ०४ थ्या मजल्यावरील समिती सभागृहामध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष तथा मा. मंत्री महोदय, मा. सचिव (कामगार) यांच्या मंडळाशी संबंधित वेळोवळी वैठका आयोजित करण्यात येतात. या बैठकांना लोकप्रतिनिधीही हजर राहतात. तसेच या हॉलमध्ये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या देखील बैठका आयोजित केल्या जातात.

सद्यस्थितीत हॉलमध्ये Projector व ७५" TV Screen ची व्यवस्था आहे. तथापि, मा. अध्यक्ष यांचे आसन व TV Screen यामधील अंतर अधिक असल्याने त्यावरील माहिती/ प्रेझेंटेशन सुस्पष्ट दिसत नाही. सदर सभागृहाचे स्वरूप पाहता या ठिकाणी Video Wall व Video Conference Syestem या अत्याधुनिक यंत्रणेची आवश्यकता आहे. सदर Video Wall व Video Conferencing Syestem यंत्रणा कार्यन्वित करण्यासाठी रू.२८.३२ लक्ष एवढा अंदाजित खर्च अपेक्षित आहे. सदरची यंत्रणा तातडीने कार्यन्वित करणे आवश्यक असल्याने सदर यंत्रणा कार्यन्वित करून त्यावरील खर्च महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जमा उपकर निधीमधून करणेबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला, सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र.५६ (१३)/२०२०:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बैठकीकरीता वापरात असलेले कामगार आयुक्त कार्यालयाच्या सभागृहामध्ये व्हिडोओ वॉल व व्हिडोओ कॉन्फरन्सिंग सिस्टम बसविण्यास व त्यावरील अंदाजित रू.२८.३२ लक्ष एवढया खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर बाबींवरील खर्च मंडळाकडील जमा उपकर निधीमधून भागविण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**